सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

महाराष्ट्र शासन
पोलीस विभाग

थेट दूरध्वनी क्र. :- +९१-२२-२२६२ १२२०
दूरध्वनी केंद्र क्र.:- +९१-२२-२२६२ ०११४
विस्तारित क्र. :- १३८ (पोलीस उप आयुक्त (प्रकटी.))
६२९ (वाचक अधिकारी),
१२१ (स्टेनो), ६२८ (लेखनिक)
ई-मेल :- cp.mum.dcp.det@mahapolice.gov.in

पोलीस उप-आयुक्त(प्रकटीकरण),
गुन्हे शाखा, मुंबई यांचे कार्यालय
पोलीस आयुक्त कार्यालयीन आवार
( नवीन इमारत), चौथा मजला,
महात्मा फुले मंडई समोर
डॉ. दा.नौ. मार्ग, मुंबई - ४०० ००१

**क्रमांक पोउआ (प्रकटी)/जा.क्र. १३६७/२०२५** **दिनांक १३/१०/२०२५**

प्रति,

प्रभारी पोलीस निरीक्षक,
पोलीस परिपत्रक कार्यालय, मुंबई.

विषय :– Best Detection of the Month Aug 2025 ''उत्कृष्ट गुन्हे शोध'' व Best Conviction of the Month Aug 2025 ''उत्कृष्ट अपराधसिध्दी'' पोलीस नोटीस व वेबसेल मध्ये प्रसिध्द करणेबाबत...

मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांचे वतीने मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या आस्थापनेवरील पोलीस अधिकारी, अंमलदारांना बेस्ट डिटेक्शन/बेस्ट कनव्हिक्शन ऑफ दि मंथ अर्थात उत्कृष्ट गुन्हे शोध, उत्कृष्ट अपराधसिध्दी याकरीता प्रत्येक महिन्याला निवड करण्यात येते.

माहे ऑगस्ट –२०२५ करीता '' **बेस्ट डिटेक्शन अर्थात ( उत्कृष्ट गुन्हे शोध ) तसेच बेस्ट कनव्हिक्शन अर्थात ( उत्कृष्ट अपराधसिध्दी)** '' याकरीताचे खालील नमुद पोलीस ठाणे याची निवड करण्यात आलेली आहे. तरी सर्व संबधीतांनी नोंद घ्यावी.

**अ)**

➢ **माहे ऑगस्ट – २०२५ गुणात्मक अन्वेषणासाठी सर्वोत्कृष्ट प्रयत्न**

१) **ॲन्टॉप हिल पो.ठाणे**, परिमंडळ ०४, मुंबई गु.र.क्र. ३६१/२५ कलम १०३, १४०(१), २३८, १३७(२) भा. न्या. सं.सह कलम ७५ बाल न्याय (मुलांची काळजी आणि सरंक्षण) अधिनियम २०१५

**ब)**

➢ **माहे ऑगस्ट – २०२५ सर्वोत्कृष्ट अपराध सिध्दी**

१) **अंमली पदाथ विरोधी कक्ष, बांद्रा युनिट**, मुंबई गु.र.क्र. ९७/२०२२, कलम ८(क) सह २२(क) एन.डी.पी.एस ॲक्ट १९८५

सदर उत्कृष्ट गुन्हे शोध (बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ) व उत्कृष्ट अपराधसिध्दी (बेस्ट कनव्हिक्शन ऑफ दि मंथ) बाबतची माहिती सोबत जोडण्यात आली असून सदरची माहिती पोलीस नोटीस व मुंबई पोलीसांचे वेबसेल वर प्रसिध्द करण्यात यावी.

**सही/–**
पोलीस उप–आयुक्त (प्रकटीकरण),
गुन्हे शाखा, गु.अ.वि., मुंबई.

**प्रत**:–
वरिष्ठ पोलीस निरीक्षक, वेबसेल, पोलीस आयुक्त कार्यालयाचे आवार, मुंबई.

**मजकुर :–**

दिनांक ०९/१०/२०२५ रोजी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुबई यांच्या आदेशाने **“ Best Detection of the Month ”** माहे **ऑगस्ट २०२५** या याकरीता खालील नमुद पोलीस ठाणेची निवड करण्यात आलेली आहे.

## (अ) १) बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ ऑगस्ट २०२५ – ०१ गुन्हा

| | | |
|---|---|---|
| ०१ | अॅन्टॉप हिल पो.ठाणे, परिमंडळ ०४, मुंबई. | **गु.र.क्र.** ३६१/२५ कलम १०३, १४०(१), २३८, १३७(२) भा. न्या. सं.सह कलम ७५ बाल न्याय ( मुलांची काळजी आणि सरंक्षण ) अधिनियम २०१५ |

**–: “ अपनयन करून जीवे ठार मारून पुरावा नष्ट करण ” :–**

**गुन्हयाची थोडक्यात हकिकत** :– नमुद गुन्हयातील फिर्यादी यांची मुलगी नामे अमायरा इमरान शेख, वय ३ वर्षे, ११ महीने हिला कोणीतरी अज्ञात इसमाने फिर्यादीचे कायदेशीर रखवालीतून त्यांचे संमतीशिवाय फूस लावून पळवून नेउन तिचा गळा दाबून खून केला व पुरावा नष्ट करण्याच्या उद्‌देशाने तिचा मृतदेह समुद्रात फेकून दिला म्हणून गुन्हा नोंद.

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी | :– | श्रीमती सयीदा बेगम अब्दुल अखील मोमीन |
| आरोपी अटक व दिनांक | :– | १) इमरान दस्तगीर शेख, वय ४२<br>**अटक दिनांक** – दि.१६/०७/२०२५ |

**तपास कौशल्यः–** सदर गुन्हयाचा तपास करीत असताना दिनांक १५/०७/२५ रोजी १२:३० वाजता कुलाबा पोलीस ठाणे हद्‌दीमध्ये अनोळखी बालिकेचा मृतदेह मिळून आल्याबाबत शोध पत्रिका प्राप्त झाली. सदर शोधपत्रिकेतील मयत मुलगी ही नमुद गुन्हयातील अपहृत बालिका असल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर नमुद गु.र.क्र.३६१/२५ कलम १३७(२), भारतीय न्याय संहिता या गुन्हयामध्ये कलम १०३,१४० (२),२३८ भारतीय न्याय संहिता सह कलम ७५ बाल न्याय (मुलांची काळजी आणि संरक्षण) अधियम २०१५ अन्वये कलम वाढ करण्यात आली आहे.

नमुद गुन्हा हा संवेदनशिल व गंभीर स्वरूपाचा असल्याने पोलीस ठाणे स्तरावर एकून १० पथके तयार करण्यात आली. नमुद गुन्हा दाखल झाल्यानंतर तात्काळ घटनास्थळी गुन्हे प्रकटीकरण पथक रवाना झाले व त्यांनी नमुद परिसरातील एकून १८ ते २० लोकांकडे चौकशी करून संशयीत आरोपीच्या वर्णनाची माहिती प्राप्त केली. नमुद अपहरणाच्या अनु ंगाने सर्व बिट मार्शल व मोबाईल वाहनावरील अंमलदार यांच्या मदतीने बळीत मुलगी हिचा बंगालीपुरा, राजीव गांधीनगर परिसरात शोध घेण्यात आला. गुन्हे प्रकटीकरण पथकाच्या मार्फतीने अॅन्टॉप हिल, माटुंगा, वडाळा, आर.ए.के. दादर, एलफिन्स्टन, लोअर परेल या परिसरातील एकून १६२ सी.सी.टी.व्ही.कॅमेरे पाहून आरोपीबाबत फुटेज प्राप्त केले.

सदर फुटेजच्या अनुषंगाने आर.ए.के. मार्ग पोलीस ठाणे हद्‌दीत, वडाळा पोलीस ठाणे, वडाळा टी.टी. पोलीस ठाणे,एन.एम.जोशी मार्ग पोलीस ठाणे, दादर पोलीस ठाणे, या हद्‌दीत पाहिजे आरोपीचा शोध घेतला. तसेच नमुद मृतदेह कुलाबा पोलीस ठाणे हद्‌दीतील ज्या परिसरात मिळाला त्या ठिकाणी जाणाऱ्या मार्गावरील सी.सी.टी.व्ही. फुटेज तपासले. सदर आरोपीच्या सी.डी.आर. नुसारा एकून ३४ लोकांना पोलीस ठाणेस आणून त्यांच्याकडे गुन्हयातील पाहिजे आरोपीच्या अनुषंगाने सविस्तर चौकशी प्राप्त केली, व त्यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीवरून आरोपी लपण्याच्या सर्व ठिकाणास भेटी देवून त्याचा शोध घेण्यात आला आहे.

नमुद गुन्हयातील आरोपी हा वारंवार त्याचे लोकेशन बदलून मुंबई शहर व ठाणे  हर येथे त्याचे अस्तित्व लपवून फिरत असल्याची माहिती प्राप्त झाली होती, त्या अनु ंगाने आरोपीच्या मोबाईलचे सी.डी.आर. व लोकेशन चे तांत्रिक विश्लेषन करून आरोपी हा वरळी नाका या परिसरात असल्याचे निष्पन्न केले. सदर आरोपी हा लोअर परेल बस स्टॉपवरून पळून जाण्याच्या तयारीत असताना गुन्हे प्रकटीकरण पथकाच्या मार्फतीने त्यास शिताफिने ताब्यात घेण्यात आले. नमुद आरोपीस अॅन्टॉप हिल पोलीस ठाणेस आणून त्याच्याकडे गुन्हयाच्या अनु ंगाने सविस्तर विचारपूस केली असता त्याने मयत मुलगी अमायरा ही त्याच्यामध्ये व फिर्यादी/पत्नी यांच्यामधील संबंधामध्ये अडसर ठरत असल्याने आरोपीने बळीत मुलीचा खून करण्याच्या उद्‌देशाने अपहरण करून भाउचा धक्का येथे नेवून तिचा गळा दाबून खून केला व पुरावा नष्ट करण्याच्या उद्‌देशाने तिचा मृतदेह समुद्रात फेकून दिल्याची कबुली दिली असल्याने त्यास नमुद गुन्हयात अटक करण्यात आली आहे.

## ॲन्टॉप हिल पोलीस ठाणे तपासी पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार

| अ.क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/अंमलदार नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| १ | पोलीस निरीक्षक | गोपाळ बाबुराव भोसले | प्रशस्तीपत्रक |
| २ | सहा. पोलीस निरीक्षक | शिवाजी कृष्णा मदने | प्रशस्तीपत्रक |
| ३ | पो.ह.क्र. ०७०९०६ | गोपाळ सिताराम टेळे | प्रशस्तीपत्रक |
| ४ | पो.शि.क्र. १५०४५८ | सुरज चंद्रकांत किरतकर | प्रशस्तीपत्रक |
| ५ | पो.शि.क्र. १५१४४६ | अक्षय हणमंत सजगणे | प्रशस्तीपत्रक |

..............................

मजकुर :–

दिनांक ०९/१०/२०२५ रोजी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुबई यांच्या ''**BEST CONVICTION OF THE MONTH"** माहे ऑगस्ट २०२५ या याकरीता खालील नमुद पोलीस ठाणेची निवड करण्यात आलेली आहे.

## (ब) बेस्ट कनव्हिक्शन ऑफ दि मंथ ऑगस्ट २०२५ – ०१ गुन्हा

| | | |
|---|---|---|
| ०१ | अंमली पदार्थ विरोधी कक्ष, बांद्रा युनिट, मुंबई. | गुरक्र व कलमः– ९७/२०२२, कलम ८(क) सह २२(क) एन. डी.पी.एस ॲक्ट १९८५ |

–: '' **अंमली पदार्थ विक्री करणे** '':–

**गुन्हयाची थोडक्यात हकिकत** :– नमुद गुन्हयातील आरोपीताने एकुण ११० ग्रॅम वजनाचा 'मेफेड्रॉन' (एमडी) हा अंमली पदार्थ वाहतुक, विक्री व व्यापार करण्याच्या उद्देशाने स्वतःच्या कब्जात बेकायदेशिररित्या बाळगला म्हणुन गुन्हा नोंद.

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी | :– | श्री. अतुल विजय सौदाणे, वय ४५ |
| निकाल दिनांक | :– | दि. २२/०८/२०२५ |
| अटक आरोपी व अटक दिनांक | :– | समिर शब्बीर शेख उर्फ समिर पाणीपुरी, वय ३२<br>**अटक दिनांक**:– १३/०५/२०२२. |
| दोषसिध्दीचा तपशील | :– | नमुद गुन्हयात श्री. एस.एम बुक्के, मा.विशेष सत्र न्यायालय कोर्ट क्र.४३, मुंबई यांनी दि. २२/०८/२०२५ रोजी १५ वर्षे सक्त मजुरी व १,००,०००/– रू.दंड ही शिक्षा सुनावली आहे. |

**तपास कौशल्य** :– आरोपीतास दोषसिध्दी व शिक्षा मिळण्याकरीता तपासी अधिकारी व पथकाने १) पंचनाम्या अंतर्गत ११० ग्रॅम एमडी जप्त करण्यात आला. २) एनडीपीएस कायदया अंतर्गत अवश्यक त्या सर्व तरतुदींची पुर्तता करण्यात आली. ३) सर्व साक्षीदारांना सुनावणी दरम्यान मा. न्यायालयात हजर ठेवुन योग्य रितीने साक्षीकरीता तयारी करून घेण्यात आली. ४) गुन्हयातील मुद्देमालाची चैन ऑफ कस्टडी कायदेशिर पध्दतीने ठेवण्यात आली व मा.न्यायालयात योग्य रित्याने सादर करण्यात आली.नमुद गुन्हयात दोषसिध्दी प्राप्त करून गुन्हयातील आरोपीस शिक्षा मिळणेकरीता उल्लेखनिय कामगिरी केली आहे.

### अंमली पदार्थ विरोधी कक्ष, बांद्रा युनिट, मुंबई तपास पथकातील अधिकारी व अंमलदारांचे नाव

| अ.क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/अंमलदार नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| १ | पोलीस निरीक्षक | श्री. संजय ज्ञानोबा चव्हाण | प्रशस्तीपत्रक |
| २ | सहा. पोलीस निरीक्षक | श्री. श्रीकांत विठ्ठलराव कारकर | प्रशस्तीपत्रक |
| ३ | पो.ह.क्र. ००३५३ | रंगनाथ सुदाम घुगे | प्रशस्तीपत्रक |
| ४ | म.पो.ह.क्र. ००४२५ | मोहना विलास आव्हाड | प्रशस्तीपत्रक |
| ५ | पो.शि.क्र. ००३०४ | अतुल विजय सौदाणे | प्रशस्तीपत्रक |